# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगांव.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

राष्ट्रीय महामार्ग कं. ६, जिल्हा उद्योग केंद्रासमोर, जळगांव.- ४२५००२

दूरध्वनी क.०२५७-२२८१५२२ फॅक्स क.०२५७-२२८१३१९

Website : www.gcoej.ac.in E-mail - princoej@rediffmail.com


जा.क्र .शाअमज/विवि-३/२०२१/281 दिनांक :- 06 FEB 2021

विद्यार्थ्यांसाठी अत्यंतमहत्वाची सुचना

विषय - सन-२०२०-२१ वर्षातील **Online** शिष्यवृती अर्ज भरणेबाबत.

संदर्भ -.१.या महाविदयालयाची सुचना जा.क.शाअमज/विवि-३/२०२०-२१/ २२६० दिनांक :-२९/१२/२०२०

२.मा.सहायक आयुक्त,समाज कल्याण,जळगांव यांचे पत्र क.२०९ दि. २९/०१/२०२१ रोजीचे प्राप्त पत्र.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्दितीय वर्ष,तृतीय वर्ष व चौथे वर्ष सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विदयार्थ्यांना संदर्भ १ च्या सुचने नुसार महाडीबीटी पोर्टलवर फी सवलतीचे **Online** शिष्यवृती अर्ज भरणेबाबत.आवश्यक त्या सुचनांसह दि. १३/०१/२१ पर्यत भरुन पुढील कार्यवाहीसाठी कार्यालयास पाठविणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेली होती. परंतु असे निदर्शनास आले आहे की, अदयापही फी सवलत घेवू ईच्छीत विदयार्थ्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे फी सवलतीचे अर्ज भरलेले नाही.

यास्तव Open - EBC, SEBC, EWS, SC, ST, OBC, SBC,VJNT प्रवर्गातील फी सवलत धारक विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, विदयार्थ्यांनी वेळोवेळी कार्यालयाकडून निर्गमित केलेल्या सुचनांप्रमाणकार्यवाही न केल्यास (फी सवलतीचे अर्ज भरणेबाबतचे ) अशा विदयार्थ्यांना येत्या नजिकच्या काळात होणा-या चाचणी परिक्षेस बसण्यास /शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या प्रथमसत्राच्या परिक्षेस मनाई केल्यास/निकाल जाहीर न झाल्यास/पुढील सत्राच्या (व्दितीयसत्रे ) फी नोंदणीस अपा ठरल्यास किंवा इतर अन्य काही कारणांमुळे विदयार्थ्यास खुल्या गटास लागुअसलेली महाविदयालयाचे संपुर्ण शुल्क भरावे लागल्यास त्यास सर्वश्री विदयार्थी स्वत: जबाबदार राहील अथवा विदयार्थ्यांस महाविदयालय सोडतेवेळी काही अडचण आल्यास त्यास विदयार्थी स्वत: जबाबदार राहील व हाणा-या परिणामास महाविदयालय जबाबदार राहणार नाही याची सर्व संबंधीत विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

संदर्भ २ च्या प्राप्त पत्रानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रथमवर्ष,व्दितीय वर्ष,तृतीय वर्ष व चौथे वर्ष सर्व अभ्यासक्रमाच्या Open - EBC, SEBC, EWS, SC, ST, OBC, SBC,VJNT प्रवर्गातील फी सवलतीचे शिष्यवृत्तीचे अर्ज अदयाप भरलेले नाही अशा सर्व विदयार्थ्यांनी आपले शिष्यवृत्तीचे अर्ज दि.१०/०२/२०२१ पर्यत तात्काळ भरण्यासाठी विदयार्थ्यांना अंतिम संधी देण्यात येत आहे. या दि.१०/०२/२०२१ नंतर प्राप्त झालेला शिष्यवृत्ती अर्ज वरीष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविल्या जाणार नाही याची सर्व संबंधीत विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्राचार्य,

शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगांव.

प्रत-१.मुख्यसुचना फलक/ विदयार्थी विभाग सुचना फलक.

२.सर्व विभागप्रमुख यांचे माहिती/कार्यवाहीसाठी.

२/-कळविण्यात येते की, त्यांनी आपापल्या अभ्यासकमाच्या सर्व विदयार्थ्यांना सदरची सुचना विदयार्थ्यांच्या ग्रुपला सदर पाठविण्यात यावी.

. श्री .डी.एम. गायकवाड,सहा. प्राध्यापक अणुविदयुत तथा प्रभारी अधिकारी शिष्यवृत्ती विभाग..

४.श्री.आर एल वाणी,प्रयोग शाळा सहा., सदरची सुचना महाविदयालयाच्या संकेतस्थळावर तात्काळ टाकावी.